प्रेसनोट दि.10.04.2024

नारपोली पोलीस ठाणे-बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र बाळगणे

नारपोली पोलीस ठाणेचे पोलीसांना मिळालेल्या माहिती वरून, सपोनि/पाटील, पोउपनि/शेलार, पोशि/7332 नाईक व त्यांचे पथकाने, दि.10.04.2024 रोजी 01.40 वा.चे सुमारास, मुंबई हायवेवरील मानकोली ब्रिज सुरू होणेपूर्वी, मानकोली, भिवंडी येथे आरोपी कमलेश फुलचंद गौतम, वय 25 वर्षे, रा.शिवगंज, उत्तरप्रदेश राज्य यास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात 2 देशी बनावटीचे पिस्टल (अग्नीशस्त्र), 2 जिवंत काडतुस, दोन मॅगझिन, सॅमसग कंपनीचा मोबाईल फोन आणि रोख रक्कम असा मुद्देमाल मिळुन आला. सदर प्रकाराबाबत सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादी वरून आरोपीविरूध्द गुन्हा रजि.क्रं.I 923/2024 भारतीय हत्यार कायदा कलम 3,25 सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37(1)(3),135 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन, आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि/शेलार हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,

पोलीस आयुक्तालय,

ठाणे शहर